असा. क्र. १ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, जानेवारी ४, २००५ / पौष १४, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.——महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम** . . . . १-३

दिनांक ४ जानेवारी २००५ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ४ जानेवारी २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

२००४ चा महा. अध्या. २. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक २८ जानेवारी २००४ रोजी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २००४ हा प्रख्यापित केला होता ;



[ **किंमत** : ९.०० रुपये ]

**आणि ज्याअर्थी,** १५ मार्च २००४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यानंतर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करण्यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २००४ (सन २००४ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १), दिनांक १७ मार्च २००४ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये मांडण्यात आले होते. तथापि, राज्य विधानमंडळाच्या उक्त सत्राची त्याच दिवशी समाप्ती झाल्याने, उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट वाटले आणि म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी १२ मे २००४ रोजी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४ (सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९) प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** २४ मे २००४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यानंतर सन २००४ चा उक्त महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवण्यात आला होता आणि उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करण्यासाठी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक, २००४ (सन २००४ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८) हे देखील दिनांक २७ मे २००४ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये मांडण्यात आले होते आणि उक्त विधेयक विधानपरिषदेकडून ९ जून २००४ रोजी संमत करण्यात आले होते. तथापि, राज्य विधानमंडळाच्या अधिवेशनाची ११ जून २००४ रोजी सत्रसमाप्ती झाल्यामुळे उक्त विधेयक विधानसभेकडून संमत होऊ शकले नाही ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट वाटले ; आणि म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी १६ जुलै २००४ रोजी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४ प्रख्यापित केला ; २००४ चा महा. अध्या १९.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे, राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे आवश्यक आहे, त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचावन्नाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २००४ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २८ जानेवारी २००४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५५ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ५५ मधील, पोट-कलम (१) च्या परंतुकातील, " दोन वर्षांच्या " या मजकुराऐवजी " तीन वर्षांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६५ चा महा. ४०.

२००४ चा महा. अध्या. १९.

३. (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४, हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई